# बोर्ड प्रश्नपत्रिका : मार्च २०१६

## इतिहास व राज्यशास्त्र

**वेळ : २ तास** **एकूण गुण : ४०**

**सूचना:**

i. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

ii. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.

iii. १ ते ५ प्रश्न इतिहास व ६ ते ९ प्रश्न राज्यशास्त्र या विषयावरील आहेत.

**प्र.१. अ. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा:** [३]

१. औद्योगिक क्रांतीचे माहेरघर _______ ला म्हटले जाते.
(इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी)

२. _______ या देशाला उगवत्या सूर्याचा देश (Land of Rising Sun)असे म्हणतात.
(भारत, जपान, चीन)

३. 'काठ्यांच्या जुडग्यातील असलेली कुऱ्हाड' हे _______ या पक्षाचे बोधचिन्ह होते.
(फॅसिस्ट, नाझी, जनता)

**ब. 'अ' स्तंभातील घटकांशी 'ब'स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा:** [३]

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| १. | नेल्सन मंडेला | अ. | भारतीय अणुयुगाचे जनक |
| २. | वाल्टर लिपमन | ब. | आफ्रिका |
| ३. | डॉ. होमी भाभा | क. | भासमान युद्ध |
| | | ड. | संगणकाचे जनक |

**प्र.२. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा (तीनपैकी दोन):** [४]

१. आर्थिक साम्राज्यवाद म्हणजे काय?

२. जपानला संन्यासी राष्ट्र असे का म्हणतात?

३. वायमर प्रजासत्ताकाची माहिती लिहा.

**प्र.३. खालील विधानांची कारणे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा (तीनपैकी दोन):** [४]

१. युरोपातील वातावरण स्फोटक बनले.

२. सुरक्षा परिषदेला युनोचे हृदय असे म्हणतात.

३. संगणकामुळे कामाची गती वाढली.

**प्र.४. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३० ते ४० शब्दांत लिहा (तीनपैकी दोन):** [६]

१. साम्राज्यवादाचे कोणतेही तीन इष्ट परिणाम लिहा.

२. लेनिनचे नवे आर्थिक धोरण (New Economic Policy - N.E.P.) स्पष्ट करा.

३. संयुक्त राष्ट्रसंघाची उद्दिष्ट्ये विशद करा.

**प्र.५. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६० ते ८० शब्दांत लिहा (तीनपैकी दोन):** [८]

१. दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम लिहा.

२. शीतयुद्धाचे परिणाम स्पष्ट करा.

३. म. गांधी युगाची माहिती खालील मुद्द्यांनुसार लिहा.

(अ) जालियनवाला बाग हत्याकांड

(ब) असहकार चळवळ

**प्र.६. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा (तीनपैकी तीन):** [३]

१. लोकशाहीत सर्व नागरिकांना मतदानाचा ________ अधिकार असतो.

(समान, असमान, मर्यादित, अप्रत्यक्ष)

२. ________ प्राप्त करणे आणि ती टिकवणे हे राजकीय पक्षाचे प्रमुख उद्दिष्ट असते.

(प्रसिद्धी, सत्ता, अल्पमत, माहिती)

३. 'स्त्री-पुरुष तुलना' हा ग्रंथ ________ यांनी लिहिला.

(सावित्रीबाई फुले, मादाम कामा, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे)

**प्र.७. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा (पाचपैकी तीन):** [३]

१. प्रत्यक्ष लोकशाही म्हणजे काय?

२. सत्ताधारी पक्ष म्हणून कोणास ओळखले जाते?

३. स्वतंत्र भारताने कोणती शासनपद्धती स्वीकारली आहे?

४. लोकशाहीपुढील सर्वात मोठे आव्हान कोणते?

५. प्रादेशिक विषमता म्हणजे काय?

**प्र.८. खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (तीनपैकी दोन):** [४]

१. भारतात संसदीय लोकशाही आहे.

२. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मुख्य प्रभाव कर्नाटक राज्यात आहे.

३. जनतेचा पुढाकार लोकशाही कमकुवत बनवतो.

**प्र.९. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर २५ ते ३० शब्दांत लिहा (दोनपैकी एक):** [२]

१. व्यक्तिस्वातंत्र्याविषयीची आव्हाने कोणती?

२. भारतातील संघराज्य पद्धतीवर टीप लिहा.